॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon )

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/२४७७/२०२०　　　　　　　　　　दिनांक: २९/०९/२०२०

प्रति,

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक
२. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि शैक्षणिक विभागांचे प्रमुख

**विषय :- दि.१ ऑक्टोबर २०२० पासून सुरू होणाऱ्या उन्हाळी २०२० च्या पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या /अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांच्या नियमित व बॅकलॉगसह विषयांच्या लेखी परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याबाबत.**

**संदर्भ** :- विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २०१/२०२०, जा.क्र.कबचौउमवि/७-अ /परीक्षा / २२८३ /२०२०, दिनांक १० सप्टेंबर, २०२०

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित परिपत्रकान्वये कळविण्यात आल्यानुसार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था, विद्यापीठ प्रशाळा आणि विभागातील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील उन्हाळी २०२० च्या पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या/अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांच्या नियमित व बॅकलॉगसह विषयांच्या स्थगीत लेखी परीक्षांचे आयोजन **दि.१ ऑक्टोबर,२०२० ते ३१ ऑक्टोबर,२०२०** या कालावधीत करण्यात आले होते.

विद्यापीठातील सर्व शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी संघटनांनी दि.२४ सप्टेंबर,२०२० पासून लेखणी बंद आंदोलन सुरू केल्यामुळे दि.१ ऑक्टोबर,२०२० पासून सुरू होणाऱ्या परीक्षांच्या आयोजनाच्या अनुषंगाने विचार विनिमय करण्यासाठी आज दि.२९/०९/२०२० रोजी आयोजित मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या तातडीच्या ऑनलाईन सभेत उपरोक्त नमूद परीक्षा नियोजित वेळेत सुरू करणे व सुरळितपणे पार पाडणे शक्य होणार नसल्यामुळे दि.१ ऑक्टोबर,२०२० पासून सुरू होणाऱ्या विद्यापीठ प्रशाळा/विभाग आणि संलग्नित महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्थामधील वर नमूद सर्व लेखी परीक्षा पुढे ढकलण्याबाबत निर्णय घेतलेला आहे.

मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार कळविण्यात येते की, दि.१ ऑक्टोबर,२०२० पासून सुरू होणाऱ्या वर नमूद सर्व लेखी परीक्षा पुढे ढकलण्यात येत असून, या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक **विद्यापीठाच्या** प्रसिध्द केले जाईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर बाब सर्व विद्यार्थी व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

(भ.प्र.पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव सविनय अग्रेषित.**

१.मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक
२.मा.उच्च व तंत्रशिक्षण राज्य मंत्री महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक
३.मा.स्वीय सहायक, सचिव, राजभवन, मलबारहिल मुंबई.
४.मा.स्वीय सहायक, अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
५.मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण),शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत,महाराष्ट्र राज्य, **पुणे-४११ ००१**.
६.मा.शिक्षण संचालक (तंत्र शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई